# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोल दिनांक ०२/०२/२०१९

## पोलीस स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

दिनांक ०२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र पोलीस दिन म्हणुन सर्वत्र साजरा केला जातो. गडचिरोली पोलीस दलाने मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे साो. गडचिरोली यांच्या संकल्पनेतुन ह्या दिनाच्या निमित्ताने ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी ' रेझींग डे' च्या माध्यमातुन आठवडाभर विविध लोकांउपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

यामध्ये आज रोजी पोलीस संकुल गडचिरोली परिसरात 'स्वच्छ भारत स्वच्छ पोलीस' मोहीम राबवुन पोलीस संकुल येथे स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत मोठ्या प्रमाणावर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला त्याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांच्या मनात पोलीसांप्रती आपलेपणाची जाणीव व्हावी व पोलीस दलाविषयी माहीती व्हावी या उद्देशाने शालेय विद्यार्थ्यांकरीता विविध पोस्टे/उप पोस्टे/पोमके अंतर्गत शस्त्र प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना शस्त्रविषयी तसेच पोलीस दलाचे कामकाज कसे चालते याबाबत माहीती देण्यात आली. तसेच गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने गडचिरोली शहरातुन पथसंचलन आयोजित करण्यात आले. यामध्ये बीडीडीएस पथक, सी-६० पथक, श्वान पथक, बँड पथक यातील अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोदविला.

' रेझींग डे' निमित्ताने पोलीस दलातर्फे २ जानेवारी ते ८ जानेवारी विविध कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले असुन यामध्ये रस्ते सुरक्षा विषयी लोकजागृती, सायबर गुन्ह्यांविषयी माहीती, सायबर दिंडी, कॅरम स्पर्धा, व्यसनमुक्ती संकल्प, कृषी मार्गदर्शक शिबीर चे आयोजन करण्यात आले असुन जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमांत सहभागी होवुन सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे साो. यांनी केले आहे.



